# मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

(केंद्र व राज्य सरकार यांचा संयुक्त उपक्रम)

संक्रमण कार्यालय 'इ'- ब्लॉक, सिटी पार्कची उत्तर बाजू, आयकर कार्यालय 'ए' विंगच्या मागे,
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१. महाराष्ट्र. संकेतस्थळ: www.mmrcl.com

**No./PRO/MMRC/81**

## महाराष्ट्रातील कुशल/अकुशल कामगारांना मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन च्या मेट्रो प्रकल्पामध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध

**कोविड -१९** च्या **लॉकडाउन** नंतर मुं.मे.रे.कॉ.लि. कडून राबविण्यात येणाऱ्या मुंबई मेट्रो लाईन-३ (कुलाबा-वांद्रे-सिपझ) प्रकल्पामध्ये भुयारी स्थानके, NATM व बोगद्यामध्ये कुशल/अकुशल कामगारांचा तुटवडा जाणवत असुन त्याचा सदरच्या कामावर विपरीत परिणाम होत आहे.
सदरचा तुटवडा भरून काढण्याकरिता व महाराष्ट्रातील कामगारांना उद्योगाच्या संधी उपलब्ध करून देण्याकरिता मुं.मे.रे.कॉ.लि. कडून राबविण्यात येणाऱ्या मुंबई मेट्रो लाईन-३ (भुयारी) प्रकल्पामध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत व त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अनु. | कामाचा प्रकार | कामाचे स्वरुप | एकूण संख्या |
|---|---|---|---|
| १ | गवंडी (mason) | भुयारी मेट्रो प्रकल्पांमध्ये स्लॅब, कॉलम, कॉंक्रीटच्या भिंती, जिने, इ. साठी कॉंक्रीटीकरण करणे, भुयारी मेट्रो स्थानकाच्या बांधकामामध्ये ब्लॉक वर्क व प्लास्टरिंग/गिलावा करणे, फरशी/फ्लोअरिंग बसविणे ई. | २७७ |
| २ | सुतार काम (carpenter) | भुयारी मेट्रो प्रकल्पांमध्ये कामांसाठी शटरिंग चे काम | ८०४ |
| ३ | फिटर (बार-बेंडिंग व फिक्सिंग करणारे) | भुयारी मेट्रो प्रकल्पांमध्ये सळई (reinforcement) बांधणे (Bar bending fixing) | २०३८ |
| ४ | वेल्डर | भुयारी मेट्रो प्रकल्पांमध्ये वेल्डिंग चे काम करणे | १६३ |
| ५ | इतर (इलेक्ट्रिशन व वायरमन) | भुयारी मेट्रो प्रकल्पांमध्ये आवश्यकतेनुसार काम करणे | ५९ |
| ६ | अकुशल कामगार | भुयारी मेट्रो प्रकल्पांमध्ये सर्व कुशल कामगारांना साहाय्य करणे | १८७७ |
| ७ | रिगर (Rigger) | भुयारी मेट्रो प्रकल्पांमध्ये आवश्यक असणारे अवजड वाहने/उपकरणे/मशिनरीसाठी | ३१२ |
| ८ | पाईप फिटर (Pipe Fitter) | भुयारी मेट्रो प्रकल्पांमध्ये पाईप फिटींग करणारे | ५८ |
| ९ | क्रेन ऑपरेटर (Crane Operator) | भुयारी मेट्रो प्रकल्पांमध्ये क्रेन ऑपरेटर | ४९ |
| | | एकूण | ५६३७ |

**कामाचे स्वरूप:** सदर स्थापत्य कामामध्ये भुयारी मेट्रो स्थानकामध्ये मुख्यत्वे स्लॅब, कॉलम, कॉंक्रीटच्या भिंती, जिने, इ. संलग्न कामांसाठी कॉंक्रीटीकरण करणे, भुयारी मेट्रो स्थानकाच्या बांधकामामध्ये ब्लॉक-वर्क व प्लास्टरिंग/गिलावा करणे, फरशी/फ्लोअरिंग बसविणे, शटरिंगचे काम, सळई बांधणे, इलेक्ट्रिशन व वायरमन, वेल्डिंग चे काम, सर्व कुशल कामगारांना साहाय्य करणे इ. कामांचा समावेश असतो. सदरहू कामे करण्यासाठी लोखंडी सळईची बंधणी (fitters), ढाच्याची बांधांनी करणेकामी कार्पेन्टर (carpenters) कॉंक्रीट करण्यासाठी कुशल/अकुशल कामगारांची आवश्यकता असते. तसेच बांधकामादरम्यान खोदकाम, साफसफाई व इतर कामांकरिता अकुशल कामगारांची देखील आवश्यकता असते.
सदर प्रकल्प हे मुंबई व मुंबई उपनगर या परिसरात वेगवेगळ्या ठिकाणी दाट लोकवस्तीमध्ये आहे. सदर मेट्रो चे काम पूर्णपणे भुयारी असून हे काम रस्त्यावर, रस्त्याखाली /जमिनीखाली सुरु असून भुयारी मेट्रो स्थानकाची लांबी अंदाजे २५० मी व रुंदी २३ मी व मेट्रो स्थानकाची ची खोली अंदाजे २७ मी. आहे. प्रकल्पामध्ये वापरले जाणारे बहुतांश स्टील (reinforcement bar) अधिक जाडीचे आहेत. सदर माहिती ही प्राथमिक स्वरूपाची असून फक्त प्रकल्पाची व्याप्ती लक्षात येण्याकरिता दिली आहे.
**कामगारांना सोयीसुविधा:** मुख्य कंत्राटदाराने निवड केलेल्या कामगारांची राहण्यासाठी व्यवस्था तात्पुरत्या कामगार वसाहतीमध्ये करण्यात येणार असून सदर वसाहतीमध्ये कंत्राटदारामार्फत मोफत पाण्याचा व विजेचा पुरवठा केला जाईल. प्रकल्पाच्या बांधकामात सामील असलेल्या मनुष्यबळाचे आरोग्य, सुरक्षा, विमा, इ. बाबींची जबाबदारी मुख्य कंत्राटदारामार्फत कंत्राटातील अटी व शर्तीनुसार करण्यात येईल. तसेच आवश्यक अनुभव/अर्हता नसणाऱ्या परंतु काम करण्यास इच्छुक असणाऱ्या अकुशल कामगारांना एक महिन्याचे प्रत्यक्ष ठिकाणी प्रशिक्षण देण्यात येणार असुन यशस्वी रित्या प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांना कामासाठी पात्र ठरविण्यात येईल.

**इच्छुक कामगारांनी/कामगार पुरवठा कंत्राटदारांनी खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.**

| सिविल पॅकेज | कंत्राटदाराचे नाव | संपर्कासाठी नाव | संपर्क क्रमांक | ई-मेल |
|---|---|---|---|---|
| १ | मे. एल.एन्ड टी. लि. व स्टेक लि. - संयुक्त उपक्रम | श्री.सपन पाठारे | ०२२-२२०२००२५ | sapan.pathare@gmail.com |
| २ | मे. एच.सी.सी.लि. व एम.एम.एस. - संयुक्त उपक्रम | श्री.सुनील श्रीवास्तव | ०२२-२२६१४५८० | mml3.qss@hccindia.com |
| ३ | मे. डोगस लि. व सोमा लि. - संयुक्त उपक्रम | श्री.घनश्याम ठाकूर | ०२२-६६६४४०८८ | ghanshyam@dogussoma.com |
| ४ | मे. सी.इ.सी.-आई.टी.डी.सेम.- टी.पि.एल. - संयुक्त उपक्रम | श्री.राकेश जोगळेकर | ८३७७८१७५१९<br>९१६७०७२८४८ | rakesh.joglekar@itdcem.com |
| ५ | मे. जे. कुमार लि. व सि.आर.टी.जी. - संयुक्त उपक्रम | श्री.विशाल सोनावणे | ०२२-२६५७००८९ | vishal.sonawane@jkumarcrtg.com |
| ६ | मे. जे. कुमार लि. सि. आर. टी. जी. - संयुक्त उपक्रम | श्री.कल्पेश कदम | ९११५२००२३७९ | kalpesh.kadam@jkumar.com |
| ७ | मे. एल. एन्ड टी. लि. व स्टेक लि. - संयुक्त उपक्रम | श्री.भाबानी सरकार | ०२२-२९२००४४४ | bhabani@lntecc.com |

मुं.मे.रे.कॉ.लि. द्वारे विविध पायाभूत भुयारी मेट्रो प्रकल्पाच्या कामाकरिता निविदा प्रसिद्ध करून कंत्राटदार नेमण्यात येतात. सदर कंत्राटदाराकडून उपरोक्त नमूद केलेल्या सर्व कामगारांचे वेतन निश्चित करून त्यांची नियुक्ती करण्यात येईल.
सबब महाराष्ट्रातील कुशल/अकुशल कामगारांनी वर नमूद केलेल्या कंत्राटदारांच्या प्रतिनिधींशी संपर्क साधावा तसेच अधिक माहिती आवश्यक असल्यास कोर्पोरेशन च्या ई-मेल mumbaimetro3mmrcl.com वर संपर्क साधावा.

सही/-
रणजीत सिंह देओल, भाप्रसे
व्यवस्थापकीय संचालक, मुं.मे.रे.कॉ.लि.

दि.: १८.०६.२०२०
ठिकाण: मुंबई - ५१